## नि.दि.मु.क्र.३५/२०१० मधील आय.ए. क्र. १/२०२१ ते ३/२०२१ (निशाणी २४४ ते २४६) वरील संयुक्तीक आदेश

निशाणी २४४ कडील अर्ज प्रतिवादी क्र. १अ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफीसाठी, निशाणी २४५ कडील अर्ज प्रतिवादी क्र. १अ विरुध्द दावा अवसान पावला तो आदेश रद्द करण्यासाठी व निशाणी २४६ कडील अर्ज प्रतिवादी क्र. १अ चे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे.

०२. वादीचे असे म्हणणे आहे की कोरोना महामारीच्या परिस्थितीमुळे ती वृध्द व आजारी असल्याने ती मुंबईहून प्रवास करु शकत नव्हती. त्यामुळे अर्ज दाखल करण्यास विलंब झालेला असल्याचे व प्रतिवादी क्र. १अ विरुध्द दावा अवसान पावल्याचे वादीचे म्हणणे आहे. प्रतिवादी क्र. १अ१ व प्रतिवादी क्र. १अ२ यांना नोटीसची बजावणी होवूनदेखील हजर न झाल्याने त्यांच्याविरुध्द प्रस्तुत अर्ज एकतर्फा चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी क्र.१३अ याने त्याचे म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतलेला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की अर्ज खोटा व खोडसाळ असून तो खर्चासह रद्द होण्यास पात्र आहे. सबब, अर्ज फेटाळण्यात यावेत अशी त्याने विनंती केली.

०३. दोन्ही बाजूच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १अ हा मयत झाला या तथ्याबाबत प्रतिवादी क्र.१३अ याने कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. प्रतिवादी क्र. १अ च्या मृत्यूनंतर त्याच्या कायदेशीर प्रतिनिधींविरुध्द दावा पुढे चालविण्याचा अधिकार टिकून राहत आहे. अर्जात नमूद केलेले कारण हे शपथेवर नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे अर्जातील कारण संयुक्तीक वाटते. सबब, तिनही अर्ज मंजूर करण्यात येतात.

**०४.** प्रतिवादी क्र. १अ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो. तसेच प्रतिवादी क्र. १अ विरुध्द दावा अवसान पावल्याचा आदेश रद्द करण्यात येतो. वादीला मयत प्रतिवादी क्र. १अ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते. त्याअनुषंगे पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी दावा दुरुस्ती करण्यात यावी व दुरुस्त दाव्याची प्रत सादर करण्यात यावी. दाव्यात दुरुस्ती झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १अ च्या वारसांना दावा आदेशिका पाठविण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by BHANUPRATAP B. CHOUHAN
Date: 2022.01.25 18:08:20 +0530

दि. २५/०१/२०२२ भानुप्रताप ब. चौहान
मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

“CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT.”

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER